# <u>प्रेसनोट</u>

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. ३०/०८/२०१८

## पुणे महानगरपालीकेच्या बांधकाम विभागातील बिगाऱ्यास (सुपरवायझर) वीस हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांचे काकांनी स.नं. ४८ बी.जी. शिर्के रोड, सहयाद्री पार्क सोसायटी पुणे येथे सन २००४ साली केलेल्या बांधकामाचा नियमितकरणाचा दाखला प्रमाणित करून देण्यासाठी व बांधकाम परवानगी नकाशाची नक्कल मिळण्यासाठी तक्रारदार यांनी महानगरपालीकेतील बांधकाम विभागाकडे अर्ज केला होता. त्यासाठी पुणे महानगरपालीकेतील बांधकाम विभागातील लोकसेवक पठारे, बिगारी (सुपरवायझर) याने पंचवीस हजार रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक ३०/०८/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक पठारे, बिगारी (सुपरवायझर) याने तक्रारदार यांचे स.नं. ४८ बी.जी. शिर्के रोड सहयाद्री पार्क येथील सन २००४ साली केलेल्या बांधकामाचा नियमितकरणाचा दाखला प्रमाणित करून देण्यासाठी व बांधकाम परवानगी नकाशाची नक्कल मिळण्यासाठी पंचवीस हजार रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली.

त्यावरुन आज दिनांक ३०/०८/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक गोपीचंद दत्तात्रय पठारे, वय - ४५, बिगारी (सुपरवायझर) बांधकाम विभाग, पुणे महानगरपालीका याने तक्रारदार यांचेकडून २०,०००/- रूपयांची लाचेची रक्कम दिलीप टि. हाऊस गावठाण शिवाजीनगर पुणे येथे स्विकारल्यावर त्याला रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे शहर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

( दत्तात्रय भापकर )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.